वर्ष ७ अंक १ : फेब्रुआरी १९४९

# अभिरुचि

संपादक :
विमल चित्रे पुरुषोत्तम आत्माराम चित्रे

## वसन्तराव चिन्धडे

### मानस-हंसा !

रे, नीज सुखेनैव अता मानस-हंसा,
ह्या श्रांत शरीरास मिळूं देत दिलासा !

आताच कुठे देह धरित्रीस विसावे,
आताच कुठे टाकियला दीर्घ उसासा,
आताच जिवाला सुखवित रे, सुम-शय्या,
तूं तोंच निघालास, सख्या, दूर प्रवासा !

मी दिवसासम आतप साहून जळालों,
मज रात्रीपरि ज्योत्स्नेची आर्त पिपासा;
परि तप्त सहाराच सभोती—जल नाही,
हा जीव तयामधि गवसे रे, जणु मासा !
जों दान पटावर टाकायास निघे मी
तों पडतो उलटाच सदा निष्ठुर फासा !

वाऱ्याहुन उद्दाम तुझी विश्व-भरारी,
पाऱ्याहुन पण जडता ह्या जीवनकोषा !
हा देह कुणी जडवादी तार्किक, तर तूं
दिव्यांतिल आभासमया मोहक योषा !
होणार कसा संगम हृदयंगम ह्यांचा ?
घेऊंच जरा दे मज विश्रांति-विशेषा !

कां पांखडिशी पंख तुझे शुभ्र रुपेरी ?
हें अंगण अपुरेंच तुझ्या रम्य विलासा.
देहांत न ह्या मावति तव विद्युत् तेजें,
उमजे न तुझी ह्या श्रुतिंना अद्‌भुत भाषा,
वर्णूं न शके माझी तुज दुर्बल वाणी,
डोळा बघवे ह्या न तुझ्या स्वर्ण-प्रकाशा !

रे, नीज सुखेनैव, सख्या मानसहंसा,
जीवास तजेला मग लाभेल जरासा.
संगेंच निघूं या मग ह्या विश्वविहारा,
उत्तुंग गिरींना कवळूं ये करपाशां,
लंघून नभाला जाऊं दूर दिगन्तीं,
बेहोष पुकारूं तेथे मंगल घोषा !

मग गात पुन्हा येऊं या तेथुन खाली,
हृत्कमलांतिल सेवूं या धुंद सुवासा;
अन् प्रीतीचा सेवुनिया मौक्तिक-चारा
तूं गीत-विशेषें घुमवी स्वीय निवासा,
समृद्धिसुखें येतिल ह्या तोंच घराला,
लाभेल घडी चिरवांच्छित आत्मविकासा !

रे, नीज सुखेनैव अता, मानसहंसा,
ह्या श्रान्त शरीरास मिळूं देत दिलासा !

## वसन्त हेबळे

### ते क्षण मज भाग्याचे—

ते क्षण मज भाग्याचे—

पुसतां यावे निष्पाप करें

आंसू परनयनींचे,
करतां यावें ओझें हलकें
दुर्बल स्कंधांवरचें,
कंटक जेथें पाडूं यावे
तेथ सडे सुमनांचे,
दुर्वच पडतां श्रवणिं वदावें
आशीर्वच हृदयींचें,
नित्य घडावें विविध विखुरल्या
दर्शन सौंदर्याचें,
वळवावे चहुफेर हृदयिं जे
निर्झर आनंदाचे,
दलितजनांच्या कारण व्हावें
अल्पहि उद्धाराचें,
आणि अहंता पूर्ण विरावी
सेवित सुख सेवेचें !

ते क्षण मज मोलाचे
होऽऽ ते क्षण मम भाग्याचे !

## राजा बढे

### जाळून पतंगा दीपकळी हासली

जरि रुचे न येणें तुझिया दारावरी,
वळतात पाउलें–काय करावें तरी ?
कां मनांत धरिसी अढी अशी, राजसे ?
भटकतें भोवती मन हें वेडेंपिसें.

कां बोल विरावे आतुर ओठावरी ?
हरली कुठे ती अधरसुधामाधुरी ?
वळविसी दृष्टि कां पाहतांच परि मला ?
झाकिसी फुला कां सहवासीं परिमला ?

कां पडते पाहुनि आठी भालावरी ?
ती नजर, प्रेमले, कां व्हावी चावरी ?
ती चोरभेट, श्वासांचे सुखविंझण
स्पर्शाचे चटके–कुठलें मग मीलन ?

फिटलें ना पुरतें नयनांचें पारणें,
फुलतें नच आता प्रीतीचें चांदणें.
जवळीक असोनी मानस दूरावलें,
वळतात मागुती कां येतीं पावलें ?

"आलास कशाला ?" म्हणती डोळे तुझे,
"जा दृष्टीपुढुनी इथे न कोणी तुझें."
घे झेप तरी ही प्रीती हृदयांतली,
जाळून पतंगा दीपकळी हासली !

## संजीवनी

### एक सानशी कळशी–

किती वेळ लाविसी ओढण्या
एक सानशी कळशी, पोरी !
दिन मावळला तरी न अजुनी
दीप लागला पुढल्या दारीं !

एकामागुन एक भराभर
रहाटास विळखा दोरीचा,
हातांसरशी खाली-वरती
नाच चालला तुझ्या उरांचा.
मधेच धापा टाकित पुससी
घाम भाळिचा निजपदराला,
पुन्हा-पुन्हा पाहसी निरखुनी
वर-वर येणाऱ्या कळशीला !

न कळे केव्हा वरी यायची
कळशी जळभरली वा अर्धी,
तळांत पाणी असे कितीसें
तेंहि कळेना काळोखामधि.

किती वेळ हें असें कळेना
तुझें ओढणें चालायाचें ?
सांग कधी तव सुभग करांनी
तृषितांना जळ लाभायाचें ?

# आ. अत्रे यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त

पाक्षिक



## यशसप्तदशी

सह्याद्रिचा उंच कडा प्रचंड
ठोकीत शड्डू पिळदार दंड
दरी दरीतून घुमवित ‘ठा ठा’
असा सत्तरीचा निधडा मराठा

विनोदी महास्फोट वक्तृत्व भाव्य
करी धन्य ही रंगभु चित्रकाव्य
ओवी सुढाळे सर मोतियांचे
मराठी मनांतील बोला फुलांचे

असामान्य साहित्यिक हा ज्वलंत
मराठी महत्तेस नेई दिगंत
सुलालित्य लेखांकण धीकुशाग्र
करी लेखणीचें अपन्यस्त खड्ग

अनिर्बंध आनंद विलास प्रीती
अन्याय हिंसा कटु-राजनीती
विपक्षावरी घाव घाली घणाचे
सामर्थ्य हे सावध लेखणीचे

प्रल्हादभक्ती स्तुति लक्षजिव्ह
स्तंभातुनि जागृत नारसिंह
नरराक्षसांचा जिरवील ताठा
दीर्घायुषी हो विजयी मराठा

—राजा बढे

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचें त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य-पत्रिका

वर्ष २५ वें, अंक १०७ ] [ ऑक्टोबर-नव्हेंबर-डिसेंबर १९५३

१०७

## भोळ्या सांबास—

सुरासुरांनी लुटलीं रत्नें
[illegible] प्याला
दिव्य अप्सरा इतरांसाठी
तव वांट्याला मिळिण बाला !
भव्य मंदिरें लाटुनि सगळीं
तुला धाडिती स्मशान-स्थानां
पालन-पोषण अन्या हातीं
संहारावर तुझी योजना !
हंसगरुडशीं कुशल वाहनें
सुखसेवेला घेऊनि आपुल्या
खास ठेविलें राखुनि एकच
तुजसाठी या मद्दड बैला !
डावपेंच हे करुनी म्हणती
'पशुपति आमुचा खराच भोळा'
हितशत्रूंना ओळख या रे,
पहा उघडुनि तिसरा डोळा !

—गो. म. कुळकर्णी.

## नवें जुनें—

अजुनि तेच सूर घुमति, अजुनि तेंच गाणें
अजुनि चितनेंहि तींच, तेच ते बहाणे !
आशेचे अंध खेळ-तीच सौख्य छाया
प्रेयाची पाठशिवी तिमिर तेज माया
अजुनि अंतरेंहि तींच उमलत्या फुलांचीं
येणारी चाहुल ती कालपावलांचीं
तशीच चालली अजून पारध नवहरिणींची
नीतीच्या बतावणींत प्रीतीचीं पुराणें

नवें जुनें न कांहिही—पुरातनांतही नवें
नव्यांतलें सनातनी नित्य जें नवें नवें
सूर्य काय कालचा आज जाहला शिळा
गीत तें नवें न काय गाइ रानकोकिळा
नांव राखती नवें जुन्यास नांव ठेउनी
हवेत नांव घ्यावयास तेच ते उखाणे

—राजा बढे.

संघ मागे पडला. आज मितिला मुंबईत तरी व्यावसायिक रंगभूमीवर गोवा हिंदू असोसिएशन ही एकमेव संस्था योजना पूर्वक नाटकें सादर करीत आहे. व कलावंतांना कशा प्रकारे वागवणूक द्यावी याचा आदर्शच घालून देत आहे मोठमोठ्या नामांकित कलावंतांना घेऊन नवीन कलावंत त्यांच्या मार्गदर्शना साठी तयार करीत आहेत. आज रंगभूमीवर यशस्वीरीत्या वावरत असलेले बरेच नवीन व्यावसायिक कलावंत याच 'स्कूल' मधून आलेले आढळून येईल. अशा प्रकारे सुस्थीर व सुव्यस्थित योजना पूर्वक कार्य करीत असलेल्या संस्थात जर व्यावसायिक नटाला स्थान मिळाले तर प्रथम त्याने स्विकारावे पण प्रत्येकाला ते शक्य होणार नाहीं. अशा कलावंतांनी या सहकारी तत्वाचा अवलंब करावा. श्री नंदनामाहेश शिरगोपीकरांची आनंद संगीत मंडळी ही सुद्धा नाट्य क्षेत्रांतील आदर्श कंपनी आहे ज्या प्रमाणे संस्थाना व्यावसायिक नाटकें निर्माण करावा असे आम्हीं म्हणतो त्याचप्रमाणें शिरगोपीकराचा पद्धती ही अत्युत्तम पद्धत आहे असे आम्हीं मानतो.

श्री. शिरगोपीकर आपल्या सर्व कलावंतांना मासिक मेहनताना देतात. त्यांनी सर्व कलावंतात एवढी आत्मियता निर्माण केली की कंपनीचे सर्व कलावंत कंपनीला आपले घर मानतात. नाट्य हा व्यवसाय म्हणून पत्करणाऱ्या मंडळींनी जर अशा प्रकारे लहान लहान कंपन्या निर्माण केल्या तर ते आपले स्थान निश्चितपणे तिथ निर्माण करू शकतील. आज मराठी रंगभूमीवर अनेक लोक व्यवसायाच्या भावनेनें येतात. सुरवातीला फुलाड नाटक मिळत आणि पुढे बकारांत जमा होतात. या लोकांना आमची सुचना आहे की त्यांनी प्रामाणिकपणें प्रयत्न करावा, धडपड करावी. यश निश्चित लाभेल.

सहकारी पद्धत या नटांच्या व तंत्रांच्या दृष्टीने उपयुक्त ठरूं शकेल. पण यांतील मंडळींनी नाट्य हा व्यवसाय म्हणून पत्करणारी असावी. सहकारी मनोरंजन ही एक हौशी लोकांची नाट्यसंस्था सहकारी पद्धतीने गेली अनेक वर्षे चालू आहे पण या संस्थेवर व्यावसायिक लोक अवलंबून नाहीत. त्यामुळे एका विशिष्ट चाकोरीच्या पलिकडे ही संस्था जाऊ शकत नाही परंतु ही संस्था एक आदर्श सहकारी संस्था आहे हे मान्य करायलाच हवे.

व्यावसायिकांनी निर्माण केलेली सहकारी संस्था ही व्यावसायिकांची संस्था असेल, व्यावसायिक पद्धतीने चालविली जाईल व त्यांची ध्येय धोरणेहि वेगळी नसतील. सहकारी क्षेत्रांतील जाणत्यांशी विचार विनिमय करून सहकारी नाट्य संस्था कशा प्रकारची असावी याचा आराखडा यथावकाश प्रसिद्ध करूं.

पुढील अंकी



"ईश्वर साक्ष खरं बोलेन खोटं बोलणार नाहीं"

१२ वा अंक
१५ जून १९६७

नांदी
पाक्षिक

संपादिका :—
सौ. सरोज तेलंग, एम्.ए.
मार्गदर्शक :—
श्री. राजाबढे

सहाय्यक :—
सर्वश्री. कमलाकर नाडकर्णी,
व. पु. काळे, वसु भगत,
कु. सुधा भट.

नागपूर प्रतिनिधि—
श्री. प्रभाकर पुराणिक

सूचना :—
भरत नाट्य मंदिर पुणे
विदर्भ साहित्य संघ नागपूर
येथे 'नांदी' मिळण्याची व्यवस्था केली आहे.

कार्यालय :—
'नांदी' (पाक्षिक)
आनन्द भुवन
शिवाजी पार्क रोड नं. ४,
दादर, मुम्बई-२८.
फोन क्र. : ४५४६४७

## जाग रे जाग उमारमणा

जाग रे जाग उमारमणा
अभागिनीवर अनाथनाथा
करि रे करि करुणा ॥धृ॥

हे रुधिर वाहती विल्वदलें ही भिजली
कशि करू आरती जीवं ज्योतिही विझली
कशि वाहु फुलें ही चुरगळली सुकली

शिव सकल मंगलें, वाहुतरी कवणा
जाग रे जाग उमारमणा

हे रुद्रहर तव आवरि शिवशंकरा
निर्गुणा हार हा अश्रुफुलांचा बरा
या रक्त सिंचनीं जिंकिन गौरीहरा

तव पदीं दयाळा वाहियले मरणा
जाग रे जाग उमारमणा

राजा बढे